# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३८८-२२ दिनांक २०/१२/२०२२

## पोलीस ठाणे येथे राबविण्यात येणार 'तक्रार निवारण दिन'

नागरिकांच्या तक्रारींवर यथोचित कार्यवाही झालेली आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी तसेच ज्या तक्रारदारांचे पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्यानंतर समाधान झालेले नाही अशा तक्रारदारांसाठी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणे स्तरावर दर शनिवारी सकाळी १०:०० ते ११:३० वाजेपावेतो तक्रार निवारण दिन राबविण्यात येणार आहे. सदरवेळी पोलीस ठाण्याचे जास्तीत जास्त पोलीस अधिकारी/अंमलदार पोलीस ठाणे येथे हजर राहणार असून पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे समक्ष तक्रारदारांच्या तक्रारींचे निरसन करण्यात येणार आहे. विभागीय सहायक पोलीस आयुक्त हे देखील त्यांचे कार्यक्षेत्रातील एका पोलीस ठाणे येथे तक्रार निवारण दिनाचे दिवशी हजर राहून तक्रारदारांचे तक्रारींवर कार्यवाही करण्याचे अनुषंगाने मार्गदर्शन करणार आहेत.

परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे उपरोक्त उपक्रमावर नियमित नियंत्रण व मार्गदर्शन राहणार आहे. त्याचप्रमाणे परिमंडळातील ज्या तक्रारदारांचे पोलीस ठाणे येथे त्यांचे तक्रारीचे अनुषंगाने समाधान झाले नाही त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी पोलीस उपआयुक्त यांचे कार्यालयामध्ये सोमवार ते शुक्रवार दुपारी ३:०० ते ५:०० या वेळेमध्ये भेट घेता येणार आहे. त्यामुळे तक्रारदारांचे पोलीस ठाणे येथे समाधान न झाल्यास त्यांनी संबंधीत पोलीस उपआयुक्त यांचेकडे तक्रार करावी याबाबत सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस उपआयुक्तांकडे समक्ष तक्रार मांडण्यासाठी काशिमिरा, नयानगर, मिरारोड, नवघर, भाईंदर, उत्तन हद्दितील तक्रारदारांनी **लक्ष्मी पार्क, कनकिया रोड मिरारोड पुर्व येथील पोलीस उपआयुक्त कार्यालय, परिमंडळ-१** संपर्क क्र ०२२-२८१०००९०, वसई, माणिकपूर, वालीव, तुळींज, आचोळे पोलीस ठाणे हद्दितील तक्रारदारांनी **वसई रेल्वे स्टेशन जवळ, वर्तक कॉलेज समोर, वसई पश्चिम येथील पोलीस** उपआयुक्त **परिमंडळ-२** संपर्क क्र. ८६६९६०४००३ व विरार, अर्नाळा, नालासोपारा, पेल्हार, मांडवी या पोलीस ठाणे हद्दितील तक्रारदारांनी **रिध्दीसिध्दी अपार्ट, वसई-नालासोपारा लिंक रोड, वसंतनगरी नालासोपारा पुर्व येथील पोलीस** उपआयुक्त **परिमंडळ-३** संपर्क क्र ०२५०-२४६०००४ येथील कार्यालयामध्ये संपर्क साधावा.